


# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १९ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## संसद म्हणजे कुस्तीचा आखाडा नाही, आमच्या खासदारानं राहुल गांधींवर...! किरेन रिजिजू संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

संसद परिसरातील हाणामारीवरून आता राजकारण तापताना दिसत आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या दोन खासदारांना धक्काबुक्की केली, असा आरोप भाजपने केला आहे. मात्र, काँग्रेसने भाजपचा आरोप फेटाळून लावला आहे. यातच, संसद म्हणजे कुस्ती आणि स्मार्टनेस दाखवण्याचे व्यासपीठ नाही, अशा शब्दात केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.

**'आमच्या खासदाराने हात उचलला असत तर...?'**

रिजिजू म्हणाले, राहुल गांधींनी शारीरिक ताकद दाखवली. त्यांनी आमच्या दोन खासदारांना धक्काबुक्की केली. आमच्या खासदारांनीही हात उचलला असता तर काय झाले असते? तुम्ही (राहुल गांधी) इतर खासदारांना मारण्यासाठी कराटे-कुंगफू शिकलात का? राहुल गांधींनी भाजपचे दोन खासदार प्रताप सारंगी आणि मुकेश राजपूत यांना जोरदार धक्काबुक्की केली, ज्यात ते गंभीर जखमी झाले.



**भाजप खासदारांनी संयम दाखवला**

केंद्रीय मंत्री रिजिजू पुढे म्हणाले, राहुल गांधींना कोणत्या कायद्याने दुसऱ्या खासदाराला धक्का-बुक्की करण्याचा अधिकार दिला? जर प्रत्येकाने आपली ताकद दाखवून हाणामारी करायला सुरुवात केली, तर संसदेचे कामकाज कसे चालेल. ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. आम्ही संयम दाखवला आहे. भाजप-एनडीएचा कुठलाही खासदार धक्का-बुक्की करत नाही. ते आपली बाजू मांडतात... लोकशाहीत सर्वांना आपले मत मांडण्याचा अधिका आहे.

खासदार आपापल्या विचारांना घेऊन संसद परिसरात आंदोलन करत असतात. काँग्रेस आणि I.N.D.I.A.चे लोक रोज निदर्शने करत असतात. आज एनडीएच्या खासदारांनी निदर्शन केले. कारण, काँग्रेस स्वातंत्र्याच्या काळापासून ते आत्तापर्यंत बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांचा अवमान करत आली आहे आणि आता संसदेच्या आत आणि बाहेरही खोटे बोलून गृहमंत्री अमित शहा यांचा व्हिडिओ कापून पसरवला, असेही केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटले आहे.

## मला संसदेत जाण्यापासून रोखत होते... धक्काबुक्कीवर राहुल गांधींचं स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नवी दिल्ली**

संसदेत गुरुवारी झालेल्या धक्काबुक्कीमुळे वातावरण चांगलंच तापलं. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर भाजपा खासदार प्रताप चंद्र सारंगी यांना धक्का देऊन खाली पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र यावर आता राहुल गांधींनी स्पष्टीकरण दिलं आहे. आम्हाला आतमध्ये जाण्यापासून रोखण्यात आलं आणि तिथे धक्काबुक्की केल्याचं म्हटलं आहे.



राहुल गांधी म्हणाले की, आम्ही मकरद्वारमधून संसदेच्या आत जात होतो. भाजपाचे लोक तिथे उभे होते आणि आम्हाला आत जाण्यापासून रोखत होते. घटनास्थळी धक्काबुक्की होऊ लागले आणि लोक खाली पडले. हे लोक संविधानावर आक्रमण करून आंबेडकरांचा अपमान करत आहेत. मुख्य मुद्दा म्हणजे ते संविधानावर आक्रमण करत आहेत.भाजपा खासदारांनी त्यांना एंट्री गेटवर थांबवल्याचा आरोप राहुल यांनी केला आहे. ते मला धक्काबुक्की आणि धमक्या देत होते. आम्ही पायऱ्यांवर उभे होतो. सर्व काही कॅमेऱ्यात कैद झाल्याचं राहुल सांगतात. खरगे यांनाही धक्काबुक्की झाली. धक्काबुक्कीने आम्हाला काही होत नाही. भाजपाचे खासदार आम्हाला संसदेत जाण्यापासून रोखू शकत नाहीत असंही म्हटलं.

## 'बाबासाहेबका अपमान नही सहेगा हिंदुस्तान' महाविकास आघाडीच्या आमदारांचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ नागपूर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुषंगाने केलेल्या वादग्रस्त वक्तव्याविरुद्ध महाविकास आघाडीच्या आमदारांनी गुरुवारी विधानभवन परिसरात आंदोलन केले.



राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू असून चौथ्या दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. सुरुवातीला संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला माल्यार्पण केले. त्यानंतर तेथून मविआचे आमदार सभागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारातून विधानभवनात आले. 'बाबासाहेबका अपमान नहीं सहेगा हिंदुस्तान' अशा जोरदार घोषणा देत विरोधकांनी विधानभवन परिसरात गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध केला. यावेळी सर्व आमदारांनी निळ्या टोप्या व दुपट्टे परिधान केले होते. 'बाबासाहेब आंबेडकर... बाबासाहेब आंबेडकर...' असा निरंतर जपदेखील महाविकास आघाडीच्या आमदारांनी केला. 'एकच साहेब, बाबासाहेब' अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आमदार अभिजित वंजारी, भाई जगताप, सचिन अहिर, डॉ. नितीन राऊत, शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे, वरुण सरदेसाई, रोहित पवार, गीता गायकवाड, भास्कर जाधव आदी आमदारांची उपस्थिती होती.

**देशाची माफी मागावी**

मला भाजपच्या नेत्यांना प्रश्न विचारायचा आहे की तुम्ही वारंवार मोदींचे नाव घेता. मग, तुम्हाला मोदींचा स्वर्ग मिळाला आहे का, असा सवाल काँग्रेसचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी उपस्थित केला. 'गृहमंत्री अमित शहा यांनी बाबासाहेबांचा नव्हे तर देशाचा, नागरिकांचा, संविधानाचा अपमान केला आहे. अमित शहा यांच्या बोलण्याची चौकशी व्हावी. तसे असल्यास त्यांनी देशाची माफी मागावी,' अशी मागणी शिवसेना उबाठाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केली. भाजपासोबत असलेल्या दलित नेत्यांना बाबासाहेबांच्या अपमानाबद्दल वाईट वाटत नाही का, असा सवाल उपस्थित करत चिराग पासवान, नितीश कुमार, चंद्राबाबू नायडू, रामदास आठवले यांनी राजीनामा देत आमच्या आंदोलनात सहभागी व्हावी, असे देखील ते म्हणाले.

**एकीकडे आंदोलन, दुसरीकडे फोटोसेशन**

विरोधकांचे आंदोलन सुरू असतानाच आमदारांचे फोटोसेशन शेजारीच सुरू होते. त्यामुळे एकीकडे आंदोलन तर दुसरीकडे फोटोसेशन असे परस्परविरोधी चित्र यावेळी बघायला मिळाले. विरोधक जय भीमचे नारे देत असताना सत्ताधाऱ्यांनी कुठलीही नारेबाजी न करता शांततेत फोटोसेशन करून सभागृहाकडे वळले. तर फोटोसेशननंतर विरोधकांनी पुन्हा जोरदार आंदोलन केले.

## आरएसएस पासून अंतर ठेवणाऱ्या अजित पवारांचे देखील दोन आमदार पोहोचले बौद्धिकाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

महायुतीच्या आमदारांनी गुरुवारी सकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या डॉ. हेडगेवार स्मृतिमंदिर परिसराला भेट दिली. यावेळी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी संघाचा परिचय करून दिला व शताब्दी वर्षांतील कार्यांबाबत माहिती दिली. विशेष म्हणजे यंदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन आमदारांनी उपस्थिती लावली होती. मागील वेळेस त्यांच्या पक्षाचा एकही सदस्य संघस्थानी पोहोचला नव्हता.



हिवाळी अधिवेशन कालावधीत २०१५ सालापासून दरवर्षी संघातर्फे भाजप व मित्रपक्षांच्या आमदारांना रेशीमबाग येथे बोलविण्यात येते. मागील वर्षी अजित पवार व त्यांचे आमदार पोहोचले नव्हते. त्यावरून राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले होते. या वर्षी मात्र राष्ट्रवादीचे राजू कारेमोरे व राजकुमार बडोले हे पोहोचले. संघ पदाधिकाऱ्यांनी त्यांचेदेखील स्वागत केले. दरम्यान, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील उपस्थित होते.

सर्व आमदारांनी आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्या समाधीस्थळी नमन केले. या वर्गाला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राधाकृष्ण विखे पाटील, मंगलप्रभात लोढा, चंद्रकांत पाटील, गिरीश महाजन, दादा भुसे, संजय राठोड, प्रताप सरनाईक, अतुल सावे, नितेश राणे, शिवेंद्रराजे भोसले, जयकुमार रावल, शंभूराज देसाई, दीपक केसरकर, गुलाब पाटील, गणेश नाईक, उदय सामंत, सुधीर मुनगंटीवार, आशिष देशमुख, रवींद्र चव्हाण, सदाभाऊ खोत, प्रसाद लाड, संभाजी पाटील निलंगेकर, भरत गोगवले, संजय शिरसाट, चित्रा वाघ, संजय कुटे, नीतेश राणे, संतोष दानवे, मोहन मते, प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, मेघना बोर्डीकर, अतुल भातखळकर, श्वेता महल्ले, निरंजन डावखरे, समीर कुणावार, परिणय फुके, मनीषा कायंदे, राम कदम, बंटी भांगडिया, गोपिचंद पडळकर, बंजारा समाजाचे धर्मगुरु बाबासिंग राठोड, सुरेश धस आदींची उपस्थिती होती.

### माझी सुरुवात संघाच्या शाखेतूनच : एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील संघाच्या मुख्यालयात दाखल झाले होते. मी याअगोदरदेखील रेशीमबागेत आलो असून समाधीस्थळाचे दर्शन घेतले आहे. संघ परिवाराचे माझे लहानपणापासून संबंध आहे. संघाच्या शाखेमधूनच माझी सुरुवात झाली आहे. नंतर मी शिवसेनेच्या शाखेत गेल्यानंतर बाळासाहेबांचे विचार आणि दिघे साहेबांचे विचारांची शिकवण घेतली. संघ आणि शिवसेनेचे विचार एकसारखे आहेत. निरपेक्ष भावनेने कसे काम केले पाहिजे हे संघ परिवाराकडून शिकावे. कुठलीही प्रसिद्धीची भावना ठेवता संघाचा स्वयंसेवक काम करत असतो, असे त्यांनी यावेळी सांगितले.

### संघकार्यात सहभागी व्हा, जनतेसाठी काम करा

संघाचे विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार यांनी उपस्थित लोकप्रतिनिधींना संघकार्याबद्दल माहिती दिली. संघाचे सध्या शताब्दी वर्ष सुरू आहे. संघाने या शताब्दी वर्षात पंचपरिवर्तनाचा नारा दिला आहे. त्या अनुषंगाने सर्व आमदारांनी देशाच्या हितासाठी कार्यरत राहावे. तसेच जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा, असे तामशेट्टीवार यांनी सांगितले. याप्रसंगी संघाचे विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधरराव गाडगे, नागपूर महानगर संघचालक राजेश लोया यांचीदेखील उपस्थिती होती.सर्व आमदारांना संघाचा प्रवास आणि कार्य सांगणाऱ्या पुस्तकाचे वाटप करण्यात आले.

## 'तो' घटनाक्रम सांगत छगन भुजबळांचा मोठा गौप्यस्फोट; थेट अजित पवारांवर रोख?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नाशिक**

लोकसभा निवडणुकीत मी नाशिकमधून उभं राहावे असं मोदी-शाहांनी सांगितले होते. त्याबाबत दिल्लीत चर्चाही झाली. मी तिकीट मागितले नाही तरीही मला उभं करण्याचं ठरलं गेले. मी तयारी केली. परंतु ४ आठवडे उलटूनही नाव आलं नाही. जो न्याय नितीन पाटलांना मिळाला तो मला का नाही?, माझ्या मंत्रिपदासाठी शेवटच्या क्षणापर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी आग्रह धरला परंतु शेवटी घेतलेच नाही असं सांगत छगन भुजबळांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. त्याशिवाय घाईघाईत प्रश्न सुटत नाही. सगळ्यांशी चर्चा करून विचारपूर्वक पाऊल उचलणार असा सूचक इशाराही अजित पवारांना दिला आहे.




नाशिकमध्ये अखिल भारतीय समता परिषदेच्या कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला गेला. त्यात छगन भुजबळांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी घडलेला घटनाक्रम सांगितला. ते म्हणाले की, मोदी-शाह यांनी नाशिक लोकसभेत भुजबळांना उभे करावे सांगितले. शिंदे म्हणाले ती आमची जागा आहे तेव्हा वरिष्ठांनी त्यावर आपण पर्याय काढू असं शिंदेंना सांगितल्यानंतर सगळे शांत बसले. मी आणि समीर भुजबळ नाशिकच्या दिशेने होतो तेव्हा प्रफुल पटेल, सुनील तटकरेंचा निरोप आला. ताबडतोड अजितदादांच्या देवगिरी बंगल्यावर या, आम्ही गेलो तिथे काय झालं विचारले? तेव्हा सांगण्यात आले रात्री ३ वाजेपर्यंत बैठक झाली. मग मला नाशिक लोकसभेबाबत झालेला निर्णय सांगण्यात आला. मी तिकीट मागितले नव्हते, मी म्हटलं समीरला उभं करा ते म्हणाले मोदी-शाहांनी सांगितले तुम्हीच उभे राहावे. मी म्हटलं मला विचार करायला २४ तास तरी द्या, त्यानंतर नाशिकला आलो. दुसऱ्या दिवशी पुन्हा भेटायला गेलो मी नको म्हटलं. तरी अजिबात काही चालणार नाही तुम्हालाच उभे राहावे लागेल. जर तुम्हाला उभं राहायचे नसेल तर तुम्ही दिल्लीला जाऊन सांगा असं मला सांगितले. मग मी निवडणुकीला तयार झालो असं त्यांनी सांगितले.

मंत्रिपदावर नसलो तरी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत, शेवटचा श्वासापर्यंत मागासवर्गीयांसाठी लढणार आहे. कुठल्याही दबावाला मी बळी पडणार नाही. मी तुमच्यासोबत राहणार आहे.

## नितीन गडकरींना उच्च न्यायालयाकडून नोटीस : तीन आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे दिले आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी नागपूर लोकसभा क्षेत्रातून सलग तिसऱ्यांदा विजयी झाले. मात्र निवडणूक जिंकण्यासाठी त्यांनी नियमभंग केले असल्याचा आरोप करणारी निवडणूक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली. गडकरी यांची खासदारकी रद्द करून पुन्हा निवडणूक घेण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली. याप्रकरणी उच्च न्यायालयाने गडकरी यांना नोटीस बजावली आहे. गडकरी २०१४ पासून नागपूर लोकसभा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करत आहे. यंदा त्यांच्या विरोधात काँग्रेसने विकास ठाकरे यांना उमेदवारी दिली होती. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत गडकरी यांनी सहा लाखाहून अधिक मते प्राप्त केली. त्यांच्या विरोधी उमेदवाराला चार लाखाहून अधिक मते प्राप्त झाली. गडकरींनी लोकसभा निवडणूक सव्वालाख मतांच्या फरकाने जिंकली होती. या विजयावर याचिकाकर्त्याने आक्षेप नोंदविला आहे.



लोकसभा निवडणुकीत बहुजन स्वराज पक्षाचे उमेदवार ड. सूरज मिश्रा यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेनुसार, १९ एप्रिल रोजी नागपूर लोकसभा क्षेत्रात मतदान पार पडले. मतदानाच्या दिवशी मतदार केंद्रांवर गडकरी यांच्या कार्यकर्त्यांनी नियमांचे उल्लंघन केले. मतदारांना एका विशेष सॉफ्टवेअरच्या माध्यमातून मतदान केंद्राची माहिती देणारी चिठ्ठी दिली जात होती. या चिठ्ठीवर निवडणुकीत उमेदवार असलेले गडकरी यांचे छायाचित्र होते. नियमानुसार मतदान केंद्र परिसरात उमेदवाराच्या नाव असलेल्या चिठ्ठ्या वितरीत करता येत नाही. याबाबत याचिकाकर्ते यांनी केंद्रीय निवडणूक आयोग, राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रार केली, मात्र यावर काहीही कारवाई करण्यात आली नाही. याचिकाकर्त्याने यानंतर उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केली. नागपूर लोकसभा निवडणुकीत नियमभंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, निवडणुकीचा निकाल रद्द करून ही निवडणूक पुन्हा घेण्यात यावी आदी मागण्या याचिकाकर्त्याने केल्या आहे.

**न्यायालय काय म्हणाले?**

लोकसभा निवडणुकीत नागपूर लोकसभा क्षेत्रातून नितीन गडकरी यांनी विजय प्राप्त केला होता. मात्र, यासाठी त्यांनी नियमभंग केले असल्याचा दावा करत पुन्हा निवडणूक घेण्याची मागणी करणारी निवडणूक याचिका ऑक्टोबरमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली होती. याचिकाकर्त्याने याचिकेत केंद्रीय निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, जिल्हा निवडणूक अधिकारी, आचारसंहिता विभागाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रतिवादी केले होते. मात्र, उच्च न्यायालयाने यांना याचिकेतून वगळण्याचे आदेश देत गडकरी यांना नोटीस बजावली.

## संपादकीय ......

# सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्यात विरोधक अपयशी

एकीकडे राज्यसभेत सभापतींच्या विरोधात देशाच्या संसदीय इतिहासात प्रथमच अविश्वास प्रस्ताव आणला आहे, तर दुसरीकडे राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल लोकसभेत झालेल्या चर्चेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्यापेक्षा चांगला वक्ता सध्याच्या सभागृहात कोणी नाही, हे पुन्हा सिद्ध केले. विरोधकांना समाधान देणारी तेवढी एकच गोष्ट आहे की, पहिल्यांदाच खासदार झालेल्या प्रियांका गांधी यांनी भाषणाने केवळ काँग्रेसच्याच नव्हे, तर विरोधकांच्या आशा उंचावल्या आहेत.

प्रियांका गांधी यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर आणि कृतींवर ज्या सहजतेने हल्ला चढवला, ते कौतुकास्पद आहे. त्याचवेळी अडवणूक करणार्या सत्ताधार्यांनाही त्यांनी आपल्या मार्मिक उत्तराने अवाक् केले. आणीबाणीबाबत सत्ताधार्यांकडून होत असलेल्या हल्लूयाला उत्तर देताना त्यांनी काँग्रेसने चुकांमधून धडा घेत माफी मागितल्याचे सहजपणे सांगितले. यासोबतच सत्ताधार्यांना सल्ले देताना त्यांनी आपले मतही मांडले. तुम्हीही काँग्रेसकडून का शिकत नाही? माफी का मागत नाही? याच क्रमात बॅलेट पेपरद्वारे निवडणुका घेण्याबाबतही त्या बोलल्या. शिकणे आणि माफीनामा यांचा संबंध बॅलेट पेपरशी जोडत प्रियांका गांधी यांनी सत्ताधार्यांना चातुर्य दाखवले आणि त्यांना इंदिरा गांधींसारखी 'न बोलणारे' समजू नये, असे स्पष्ट केले. इंदिरा गांधी जेव्हा सभागृहाच्या सदस्य झाल्या, तेव्हा त्यांना 'न बोलणारी' असे संबोधले जात होते. नंतर त्यांनी या प्रतिमेला छेद देत स्वतःला 'दुर्गा' म्हणवून घेतले.

संविधानावरील चर्चेदरम्यानच्या भाषणांचा आढावा घेतला तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जुन्या-नव्या सर्व गोष्टींची सांगड घालून काँग्रेसवर हल्ला चढवला. नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि अगदी राहुल गांधी यांनाही सोडले नाही. नेहरू आणि गांधी घराण्याने राज्यघटनेचा अवमान केल्याची उदाहरणे देत त्यांनी तीन पंतप्रधानांच्या कार्यकाळातील त्रुटींकडे लक्ष वेधले. सरदार पटेल यांना पंतप्रधान न करण्याच्या नेहरूंच्या मनमानी कारभाराचा उल्लेख करून त्यांनी काँग्रेसच्या घराणेशाहीचा स्वार्थी स्वभाव दाखवला. दुसरीकडे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाषणाने निराशा केली. प्रियांका गांधींनी सांगितलेल्याच सर्व गोष्टी त्यांनी पुन्हा सांगितल्या. प्रियांकाच्या भाषणांव्यतिरिक्त इतर मुद्द्यांवरून सरकारला कोंडीत पकडण्याची संधी त्यांनी गमावली. राहुल गांधी यांच्या भाषणातील अनेक गोष्टी जुन्या होत्या, ज्या त्यांनी अनेक वेळा सांगितल्या आहेत. राहुल गांधी यांनी एकलव्य आणि द्रोणाचार्यांची गोष्ट सांगत जातीय आधारावर सत्ताधारी पक्षाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला; मात्र समन्वयाअभावी हा प्रयत्न पूर्णपणे फसला.

प्रियांका गांधी यांच्या भाषणाबद्दल बोलायचे झाले तर, हे सर्वोत्कृष्ट भाषण होते. प्रियांका यांनी भाषणात शेतकर्यांचे प्रश्न मांडले. यावेळी त्या आपल्या लोकसभा मतदारसंघाचा उल्लेख करायला विसरल्या नाहीत. सरकारला कोंडीत पकडण्यासाठी त्यांनी वायनाड ते ललितपूरपर्यंतच्या शेतकर्यांच्या स्थितीचा उल्लेख केला. संभल आणि उन्नावच्या घटनांचा संदर्भ देत त्यांनी दलित आणि अल्पसंख्याकांवरील अत्याचाराबाबत केंद्र सरकारवर हल्लाबोल करताना मागेपुढे पाहिले नाही. जातनिहाय जनगणनेबाबत बोलून त्यांनी मागासवर्गीयांना मदत करण्याचे काम केले. देशातील महिलांना म्हणजे निम्म्या लोकसंख्येला प्रतिनिधित्व देण्यासाठी दहा वर्षांनंतर महिला आरक्षण लागू करण्याचा मुद्दा योग्य पद्धतीने मांडला आणि सरकारला कोंडीत पकडले. आजच्या महिलांनी आपल्या हक्कासाठी दहा वर्षे का वाट पाहावी, असेही त्या म्हणाले. महिलांसाठी असलेला हा संदेश त्यांच्या मतांत बदलला तर येत्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला नुकसान सहन करावे लागू शकते. पुढील वर्षी दिल्ली आणि बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. अशा स्थितीत प्रियांका यांच्या शब्दांचा काय परिणाम होईल, याचा अंदाज सहज लावता येतो. त्यांनी आपले सर्व विचार अगदी प्रामाणिकपणे मांडले. प्रियांका गांधी यांच्याकडे जबाबदारी देण्याबाबत पक्षांतर्गत चर्चा होऊ शकते. प्रियांका गांधी यांना विरोधी पक्षनेतेपद देण्याची मागणीही होऊ शकते. इतर विरोधी पक्ष जे राहुल गांधी यांच्या नावावर कुरघोडी करतात, त्यांनाही प्रियांकांसोबत चालणे सोयीचे वाटू शकेल. प्रियांका यांनाही महिला असल्याचा फायदा मिळणार आहे.लोकसभेत या चर्चेपूर्वी राज्यसभेत जे घडले त्या घटनेची इतिहासात नोंद झाली आहे. सभापती जगदीप धनकड यांच्या विरोधात ६० राज्यसभा सदस्यांच्या स्वाक्षरीचा प्रस्ताव आणण्यात आला आहे, ज्यामध्ये पक्षपातीपणाच्या कारणावरून त्यांना पदावरून हटवण्याची मागणी करण्यात आली आहे; मात्र तो धक्का देण्याइतकी ताकद विरोधी पक्षांकडे नसल्याने हा प्रस्ताव मंजूर होण्याची शक्यता नाही. मात्र, हा संदेश चिंताजनक आहे. यावरून सभागृहाचे प्रमुख, सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यातील संवादाची दरी आणि विश्वासाचा अभाव दिसून येतो. लोकशाही व्यवस्थेत संसद हे चर्चेसाठी सर्वोच्च व्यासपीठ असते. राजकीय पक्ष लोकांचे प्रतिनिधित्व करतात, त्यांनी संसदेत बोलले पाहिजे, विविध बाबींवर त्यांची सहमती आणि असहमती दर्शवली पाहिजे; मात्र संसदेत संवाद होत नाही, तर सभागृह आता एक उच्च ध्रुवीकरणाचे एक मंच बनले आहे, जेथे आरोपांची देवाणघेवाण होते, शत्रुत्व अधिकच वाढते. हे सत्र चालू असतानाही अनेक वेळा कामकाज स्थगित केले गेले.

# नेपाळ येथील टेनिस क्रिकेट स्पर्धेकरिता आराध्या मालगे हीची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ अमरावती**



अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कुंभारगाव येथील रहीवासी असलेले सहायक शिक्षक धनंजय मालगे यांची कन्या आराध्या मालगे हीची नेपाळ येथे होणाऱ्या ज्युनिअर टेनिस क्रिकेट मुलींच्या स्पर्धेकरिता, ज्युनिअर भारतीय संघात निवड झाली आहे. आराध्या अमरावती येथील गोल्डन किड्स शाळेची विद्यार्थिनी आहे. या यशाबद्दल भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या सचिव मीनाक्षी गिरी, संस्थेच्या सचिव हर्षदा पांडे, मुख्याध्यापक उमाशंकर सिंगरोल, पर्यवेक्षक पराग देशपांडे, वर्गशिक्षक, संस्थेचे पदाधिकारी यांनी आराध्या मालगेचे कौतुक केले आहे. यशाचे श्रेय ती आई प्रीती मालगे, वडील धनंजय मालगे, क्रीडाशिक्षक नितीन सराफ व सुमेधा पारखी यांना देत आहे.

## समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी जयंती पुण्यतिथी : ह भ प सोपान महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १९ अमरावती**

आपआपसातील राग, लोभ, माया, मत्सर तसेच राक्षसीवृत्ती नाहीशी व्हावी. एकमेकांविषयी स्नेहभाव निर्माण व्हावा. संतांचे विचार समाज उन्नतीसाठी कामी यावेत.यासाठी आध्यात्मिक उन्नती आवश्यक आहे, म्हणून जयंती पुण्यतिथी महोत्सव आयोजित करण्यामागचा हेतू असतो. अशी अध्यात्माची गरिमा आपल्या चतुर्थ पुष्पात हभप सोपान महाराज यांनी भागवतकथेदरम्यान गाडगेबाबानगर येथे गुंफली.

# टेक्स्टाईल पार्क, बेलोरा विमानतळ, पर्यटन विकास, आयटी पार्क संदर्भातील मुद्द्यांवर वेधले शासनाचे लक्ष

## माझी लाडकी बहीण योजनेचे अनुदान एकवीसशे रुपये करण्याची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९ नागपूर**

महिलांचे आरोग्य व पोषण तसेच त्यांना आत्मनिर्भर करणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अनुदान हे १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून निवडून येताच हेच कर्तव्य आपण प्रथम हाती घेणार असल्याचे आश्वासनआमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी निवडणूकपूर्व काळात दिले होते. त्याअनुषंगाने महाराष्ट्र विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेताच आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी नागपूरात सुरु असलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात माझी लाडकी बहीण योजनेचे अनुदान १,५०० वरून २,१०० रुपये करण्याची मागणी करीत सभागृह दणाणून सोडले.

महाराष्ट्र विधानसभा डिसेंबर -२०२४ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात आज दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करतांना अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी अमरावतीच्या विकासाच्या दृष्टीने मेगा टेक्सटाईल पार्क, बेलोरा विमानतळ, अभियांत्रिकी संस्थांमध्ये वर्क फ्रॉम टॉऊन, शहरातील धार्मिक स्थळांचा पर्यटनस्थळाप्रमाणे विकास असे विविध मुद्दे उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले.

महाराष्ट्र शासन मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अनुदान डिसेंबर पासून प्रतिमहिना १,५०० वरून २,१०० रुपये इतके करणार आहे. एका व्यक्तीला केवळ एकाच लाभांच्या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अनुदान २१०० रुपये करत असतांना संजय गांधी निराधार योजना व श्रवणबाळ योजनेचे अनुदान सुद्धा २१०० रुपये करण्याची विनंती आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी शासनाकडे केली आहे.

अमरावती शहरातील रोजगाराचा अनुशेष दूर करण्याची मागणी करतांना आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी अमरावती मधील अभियांत्रिकी संस्थांमध्ये वर्क फ्रॉम टाऊन सुरु करण्याचा मागणीचा पुनरोच्चार केला. मागील जुलै २०२४ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये अमरावती येथे वर्क फ्रॉम टाऊन सुरु करण्याची मान्यता शासनाच्या वतीने देण्यात आली होती, आता याला चालना देण्याची गरज असल्याचे सांगून आमदार महोदयांनी सांगितले की, अमरावती शहरात अनेक



अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्था असून दरवर्षी शेकडो विद्यार्थी पदविका घेतात. मात्र त्यांना रोजगार मिळत नसल्याने त्यांना मुंबई , पुणे सारख्या शहरात नोकरीकरिता जावे लागत आहे. तरुणांनी अन्य शहरात स्थानांतर केल्याने अमरावती शहर हे जेष्ठ नागरिकांचे शहर होणार का ? अशी शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आयटीचे शिक्षण घेणाऱ्या स्थानिक युवकांना अमरावतीतच रोजगार उपलब्ध व्हावा , यासाठी अमरावती मध्ये वर्क फ्रॉम टाउन सुरु करण्यात यावा, यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १२५ एकर परिसरात चांगले महाविद्यालय सुरु असून तेथे जागा सुद्धा उपलब्ध आहे , म्हून ती जागा हस्तांतरित करण्यात यावी यासाठी आपण प्रस्ताव सुद्धा दिला असून , त्याठिकाणी नामांकित कंपन्यांना बिल्डिंग व चांगले इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून कंपन्यांना भाडे तत्वावर जागा उपलब्ध करण्यात देण्यात यावी. अशी मागणी सुद्धा आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी लावून धरीत नागपूर अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधले.

त्याचबरोबर अमरावती शहरामध्ये टेक्स्टाईल पार्क मंजूर झाला असून त्याठिकाणी तीन-चार वर्षांपासून रेमंड सारखी कंपनी काम करते. परंतु त्या ठिकाणी असणारे युनिट चालू नसल्याने त्या ठिकाणी तीन फेज मध्ये सुरु होणारे काम सद्या एका फेज मध्येच चालू असल्याने तरुणांना रोजगार मिळणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे येथील कंपन्यांच्या ज्या काही अडचणी आहेत , त्या सोडविण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा व मेगा टेक्स्टाईल पार्क सुरु करण्याची मागणी सुद्धा सभागृहासमक्ष करण्यात आली.

शहराच्या उद्योग व दळणवळणाला चालना देण्यासाठी अमरावती बेलोरा विमानतळ सुरु होणे आवश्यक आहे. अमरावती विमानतळावरून डिसेंबर पासून प्रवासी विमान सेवा सुरु करण्याच्या हालचाली मध्यतंरी शासन स्तरावर सुरु होत्या. मात्र अजूनही लँडिंग सुरु झाले नाही. विमानतळाची सुविधा असेल तर आयटी कंपन्या येतील , चांगले उद्योग येतील, याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन अमरावती बेलोरा विमानतळ सुरु करण्यासाठी कार्यवाही करण्याची विनंती सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आली. तसेच जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी धारणी येथे इको-टुरिजम ला मान्यता देण्यात आली आहे. मात्र त्यावर कुठलीही तरतूद आली नाही. त्याला सुद्धा शासनाने मान्यता द्यावी. तसेच चिखलदरा हे अमरावती जिल्ह्यातील मुख्य पर्यटन स्थळ आहे. मात्र त्याठिकाणी कुठलीही सुख-सुविधा नाही. म्हणून शासनाने त्याकडे सुद्धा लक्ष द्यावे. आणि पर्यटन स्थळाचा विकास होण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी. सोबतच अमरावती मध्ये श्री. अंबादेवी व एकविरा देवीचे मंदिर आहे. त्याचा पर्यटनस्थळाप्रमाणे विकास व्हावा , म्हणून शासनाकडे प्रस्ताव देण्यात आला आहे. अमरावती मध्ये हजारो भाविकभक्त देवीच्या दर्शनाकरिता येत असतात , त्यांना सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून आगामी मार्च च्या बजेट मध्ये श्री. अंबादेवी व एकविरा देवी मंदिराच्या विकासाकरिता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी केली.




## हिवाळ्यात व्यायाम सुरू करण्याचे 'हे' आहेत फायदे



**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळ्यात व्यायाम सुरू करणे फायदेशीर असते. हिवाळ्यात घाम कमी येतो, हवा सुसह्य असते. त्यामुळे व्यायाम केल्यावर अधिक फ्रेश वाटते. व्यायामामुळे शरीराची आणि स्नायूंची क्षमता वाढते. शरीराला पुरेशा प्रमाणात प्राणवायू मिळण्यास मदत होते. रोगप्रतिकारक शक्तीही वाढते. व्यायामाचा अतिरेक होता कामा नये. उत्तम मार्गदर्शकाच्या सल्ल्याने तो करावा.

**व्यायाम हळूहळू वाढवा...**

मनात आले आणि लगेच भरपूर प्रमाणात कोणताही व्यायाम सुरू केला, असे करून चालत नाही. कोणाचे तरी अनुकरण करून दोन दोन तास व्यायाम करतात, जिममध्ये जातात, वजने उचलतात. परंतु ते प्रत्येकाच्या शरीराला झेपणारे नसते. त्यामुळे आधी ब्रिस्क वॉकिंग, पोहणे, सूर्यनमस्कार, चालणे, धावणे असे सोपे व्यायामप्रकार करणे उत्तम. त्यानंतर हळूहळू व्यायामाचा वेळ आणि आवर्तने वाढवत न्यावीत.

**पुरेसा वेळ महत्त्वाचा**

एकाच दिवशी वेगवेगळे व्यायाम प्रकार थोडा-थोडा वेळ करण्याची चूक केल्याने शरीराला नुकसानच होते. कोणताही व्यायाम योग्य पद्धतीने आणि ठराविक वेळ केल्यास त्याचा फायदा होतो. त्यामुळे एका व्यायाम प्रकाराला पुरेसा वेळ देणे महत्त्वाचे आहे. आठवड्यात दोन दिवस एक व्यायाम प्रकार करावा किंवा एक दिवसआड अशा पद्धतीनेही व्यायामाचा मेळ घालून वेळापत्रक तयार करता येईल. काही व्यायाम प्रकार शरीराची लवचिकता वाढवतात, तर काही व्यायाम प्रकार स्नायूंची क्षमता वाढवतात. त्यामुळे दोन्ही व्यायाम प्रकारांचा मेळ घालून तो केला जावा आणि त्यासाठी लागणारा पुरेसा वेळ नियोजनपूर्वक राखून ठेवावा. वेळ पुरत नाही म्हणून व्यायाम कसाबसा उरकता येत नाही.

**वॉर्मअप**

कोणताही व्यायाम करण्यापूर्वी आणि नंतर वॉर्मअप आणि कूल डाऊन करणे महत्त्वाचे. अचानक व्यायाम सुरू केल्यास वाढत्या वयात स्नायू आणि सांध्यांना इजा होण्याची शक्यता असते. त्यामुळे स्ट्रेचिंगचे व्यायाम करणे गरजेचे. त्यामुळे स्नायूंना हालचालीची सवय होते. वॉर्मअप केलेले नसते, तेव्हा स्नायू व्यायामासाठी तयार नसतात. अर्धा- पाऊण तास पळाल्यानंतर वेग हळू हळू कमी केला पाहिजे. तसेच व्यायामाचेही असते.

**योगासने उत्तम**

हिवाळ्यात योग केल्यास शरीर उबदार आणि लवचिक राहते. अन्नपचन सुधारते. विशेष म्हणजे थंडीत केलेल्या योगासनांचे फायदे पुढे ७-८ महिने होतात. पुढील ऋतुचक्रासाठी शरीर तयार होते. नियमित योगासनांमुळे शरीर आणि मन उल्हसित राहते. थंडीत सूर्यनमस्कार, पर्वतासन, वीरभद्रासन, मत्स्यासन, हलासन, सर्वांगासन करतात.

# हरभरा पिकातील मर रोगाच्या नियंत्रणासाठी प्रभावी जैविक उपाय कोणते? वाचा सविस्तर

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

रब्बी हंगामातील महत्त्वाचे घेतले जाणारे हरभरापीक सध्या जोमात असून, हरभऱ्याचे घाटे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. मागील काही दिवसांपूर्वी असलेले ढगाळ वातावरण हरभऱ्यावरील घाटेअळीस पोषक ठरते आहे.

तर या परिस्थितीत प्रामुख्याने घाटेअळी बरोबर मर रोगाचाही प्रादुर्भाव हरभऱ्यावर दिसत आहेत. पीक वाचविण्यासाठी या रोगाची लक्षणे ओळखून वेळीच नियंत्रण करणे गरजेचे असते. या रोगाची लक्षणे आणि उपाय काय आहेत, यासंदर्भातील सविस्तर माहिती पाहूया.

**रोगाचा प्रसार व नुकसान**

हरभरा पिकातील अतिशय महत्वाचा रोग असून याची लागण फ्युजारियम ऑक्झीस्पोरम ह्या बुरशीमुळे होतो.

मर रोगामुळे भारतात सरसरी १५-२०% नुकसान होते. रोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात असल्यास ७०-१००% पर्यंत नुकसान संभावते. रोगाचा प्रसार मातीतून आणि बियाण्याद्वारे होतो. उष्ण व कोरड्या वातावरणातील लागवड क्षेत्रात या रोगाची लागण मोठ्या प्रमाणात होते.

**लक्षणे**

रोगाची लागण पिकाच्या




कोणत्याही अवस्थेत होऊन मर होते. रोगग्रस्त झाडाच्या मुळाच्या आतील भाग तपकिरी काळपट रंगाचा दिसून येतो. फांद्या जमिनीच्या दिशेने लोंबकळल्या

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

सारख्या दिसतात.

**नियंत्रण/उपाय**

१) रोगाचा प्रसार बियाणे व मातीमधून होत असल्यामुळे या रोगाच्या नियंत्रणाच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना महत्वाच्या ठरतात. २) उन्हाळ्यात खोल नांगरट करावी, जेणेकरून सूर्यकिरणांमुळे बुरशीचे बीजाणू नष्ट पावतील.३) शेतामध्ये वनस्पतीचे कुजके अवशेष, काशा, धसकटे व काडी कचरा असू नयेत.४) शेत आणि बांध स्वच्छ ठेवावेत जेणेकरून रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार होणार नाही.५) रोगट झाडे दिसता क्षणिच उपटून नष्ट करावी.६) बीजप्रक्रिया करताना ट्रायकोडर्मा १० ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे.७) रोग प्रतिकारक वाणांची निवड करावी. ८) पिकाची फेरपालट करावी. ९) बायोमिक्स १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करिता वापरावे. १०) रोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात असल्यास २०० ग्रॅम अथवा मिली बायोमिक्स १० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण करून आळवणी करावी. ११) पिकातील घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे तसेच जमिनीत पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घावी. १२) एकाच शेतात तेच ते पिक घेणे टाळल्यास रोगाचा प्रादुर्भाव होण्यास आळा बसतो. १३) अर्थात पिकांची फेरपालट आणि आंतरपिकाचा शेतीत समावेश करावा.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# जिल्ह्यात सुरक्षितता कितपत? वर्षभरात बलात्कार विनयभंगाचे ३८३ एफआयआर

## शाळकरी मुली लक्ष्य : वर्षभरातील अपहरण, अत्याचार उघडकीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ अमरावती**

शहर असो वा जिल्ह्याचा ग्रामीण भाग, अल्पवयीन मुली तथा कॉलेजवयीन मुलींचा पाठलाग, विनयभंग व अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. शहर वा जिल्ह्यात मुली, महिला किती सुरक्षित आहेत, असा प्रश्न समाजाला भेडसावू लागला आहे. कौटुंबिक कलहदेखील पोलिस ठाण्यात पोहोचत आहेत. सोबतच काही अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेण्यासह त्यांच्यावर अकाली मातृत्व लादल्याच्या घटनादेखील उघड झाल्या आहेत. सोशल मीडियाचा अतिवापर कॉलेजवयीन मुलींच्या पाठलागास, विनयभंगास, बलात्कारास कारणीभूत ठरत आहे.

चार महिन्यांपूर्वी शिरखेड व तिवसा पोलिस ठाण्यांच्या हद्दीत दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रयत्नांमुळे शाळकरी मुली नराधमांचे सॉफ्ट टार्गेट ठरत असल्याचे चित्र आहे. यंदाच्या पहिल्या ११ महिन्यांत बलात्कारातून १५ पेक्षा अधिक अल्पवयीन मुलींवर अकाली गर्भारपण लादण्यात आले. सोशल मीडियातून झालेली ओळख, त्यातून त्या अनोळखी व्यक्तीप्रति निर्माण झालेले आकर्षण तसेच लग्नाच्या आमिषापोटी अनेक मुलींना शारीरिक अत्याचाराला, अपहरणाला सामोरे जावे लागत असल्याचे निरीक्षण पोलिसांनी नोंदविले आहे.



विनयभंग, छेडछाडीचे प्रकार रोखण्यासाठी दामिनी पथके, महिला पथकेदेखील कार्यान्वित करण्यात आली आहेत. धरण व निर्जनस्थळी गस्तदेखील वाढविण्यात आली आहे. असे गुन्हे तातडीने दाखल करून तपास केला जातो.
**– किरण वानखडे, पोलिस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा**

**सोशल मीडियाच्या माध्यमातून त्रास**

गेल्या दीड वर्षांत घडलेल्या सायबर गुन्ह्यांमध्ये सोशल मीडियावरून होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण १६ टक्क्यांपेक्षा जास्त असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे फेसबूकवरून होणाऱ्या गुन्ह्यांच्या तक्रारींचे प्रमाण सर्वाधिक आहे. सोशल मीडियावरील वाढत्या सायबर गुन्ह्यांमुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली आहे. सोशल मीडियावरून वेगवेगळ्या पद्धतीने तरुणींना त्रास दिल्याबाबतचे अर्ज सायबर सेलकडे येत आहेत. या अर्जाचा तपास केल्यानंतर या गुन्ह्यांमधील आरोपी पीडित तरुणीच्या ओळखीचे किंवा जवळचे असल्याचे दिसून येते.

**बलात्कार, विनयभंगाचे ३८३ गुन्हे**

ग्रामीण जिल्ह्यात यंदाच्या जानेवारी ते नोव्हेंबर दरम्यान महिलांवरील अत्याचार व विनयभंग असे एकूण ३८३ गुन्हे नोंदविण्यात आले. सर्व गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला. यंदा अल्पवयीन मुला-मुलींच्या अपहरणाचे एकूण २०२ गुन्हे नोंदविण्यात आले. पैकी १७४ मुला-मुलींचा शोध घेण्यात आला आहे. यंदाच्या ११ महिन्यांत बलात्काराचे ११७, तर विनयभंगाचे २६६ गुन्हे नोंदविण्यात आले.

**गतवर्षीच्या ११ महिन्यांत अशी झाली गुन्ह्यांची नोंद**

सन २०२३ च्या जानेवारी ते नोव्हेंबर दरम्यान महिला अत्याचाराचे १०४, तर विनयभंगाबाबत २८१ एफआयआर नोंदविले. विनयभंगाची एक घटना वगळता ३८४ एफआयआरमधील सर्व आरोपींना अटक करण्यात आली.

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या परीक्षेत २३ विषयाच्या प्रश्नपत्रिका चुकीच्या

## दोषींवरवर कठोर कार्यवाही करण्याची सिनेट सभेत डॉ नितीन टाले यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ नांदगाव खंडेश्वर**

परीक्षाकेंद्री शिक्षण पद्धतीचा स्वीकार करून वर्षभर विद्यार्थ्यांना केवळ परीक्षांमध्येच गुंतवून ठेवण्याचे काम आज विद्यापीठ करत आहे. परंतु या परीक्षांचे सुव्यवस्थित नियोजन सुद्धा विद्यापीठाला साध्य होऊ शकले नाही. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२४ च्या परीक्षांमध्ये तब्बल २३ विषयांच्या प्रश्नपत्रिका चुकीच्या आणि नियमबाह्य पद्धतीने करण्याचा पराक्रम अमरावती विद्यापीठाने केला आहे .

बी.ए. संगीत विषयाची प्रश्नपत्रिका तर ५० गुणांऐवजी फक्त ४२ गुणांची काढण्यात आली. २३ तक्रारींपैकी केवळ पाच प्रकरणे पुढील तपास करण्याकरिता केंद्रीय मूल्यमापन समिती ने ४८(५)अ समितीकडे शिफारस केली असून इतर विषयातील दोषींना मात्र अभय देण्यात आले आहे.आयुष्याचे स्वप्न रंगवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी



खेळण्याचे काम विद्यापीठ अशा गलथान कारभारामुळे करीत आहे.

उच्च शिक्षणाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याची जबाबदारी विद्यापीठांची असून दर्जेदार शिक्षणासाठी जागतिक स्पर्धा आज विद्यापीठांची सुरू आहे . संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा प्रवास मात्र उलट्या दिशेने होत असल्याचे दिसून येते.

नुकत्याच पार पडलेल्या सिनेट सभेत डॉ. नितीन टाले यांनी या गंभीर विषयाकडे लक्ष वेधत याबाबतची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. परिक्षा पद्धतीतील दोष व प्रश्न पत्रिकेतील त्रुट्या यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येते. विद्यापीठाची प्रतिमा मलिन करणारी अक्षम्य अशी ही चूक आहे असा रोष डॉ. नितीन टाले यांनी सभागृहात व्यक्त केला.

**कोणत्या दर्जाचे अभियंते विद्यापीठ घडवणार**

संत गाडगेबाबा विद्यापीठाने चुकीच्या व नियमबाह्य काढलेल्या २३ प्रश्नपत्रिकांपैकी ११ इंजीनियरिंग शाखेच्या आहेत. अलीकडच्या काळात इंजिनिअरिंगच्या स्वायत्त मविद्यालयांमध्ये प्रवेशाला विद्यार्थी प्राधान्य देत आहेत. स्वायत्त महाविद्यालय आपल्या अभ्यासक्रमाची रचना प्रात्यक्षिक पूरक व उद्योजकांना आवश्यक असलेल्या तंत्रज्ञानावर आधारित करतात त्यामुळे या महाविद्यालयातून प्लेसमेंट ची खात्री असते.

या बाबींचा विचार करून विद्यापीठ सुधारणा तर करत नाहीच त्या उलट चुकीच्या प्रश्नपत्रिकाकडून देशाचे भविष्य घडविणाऱ्या अभियंताच्या आयुष्याशी खेळत आहे.

# अमरावतीच्या शिवसेना उबाठा गटाला खिंडार

## नागपुर येथे अनेक पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ अमरावती**

शिवसेना शिंदे गटाचे नेते कॅप्टन अभिजित अडसुळ यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अमरावती जिल्ह्यातील शिवसेना उबाठा गटाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी नागपुर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेचा झेंडा हाती घेतला. त्यामुळे अमरावतीच्या उबाठा गटाला मोठे खिंडार पडले आहे.

विधानसभा निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेच्या शिंदे गटाने उबाठा गटावर मात करीत मोठी भरारी घेतल्याने त्याचे पडसाद अमरावती जिल्ह्यात उमटायला सुरुवात झाली आहे. सोबतच उबाठा गटाकडून विधानसभेत उमेदवारी देतांना स्थानिक पदाधिकाऱ्यांना विचारात न घेतल्याने नाराज असलेल्या अमरावतीतील अनेक पदाधिकाऱ्यांनी बुधवारी शिंदे गटात प्रवेश घेतला. शिंदे गटात प्रवेश घेणाऱ्यांमध्ये शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख श्याम देशमुख,आशिष धर्माळे, महिला आघाडीच्या वर्षा भोयर, माजी नगरसेवक ललित झंझाड, युवानेता राहुल माटोडे, राजेंद्र दारोकार, मधुकर शिंदे, मारोतराव पोकळे, भारत टिंगणे, निलेश गव्हाळे,विजय शिंदे, गौरव शिंदे, रोहीत धोटे, संजय श्रीराव, शशीराज काकडे, विद्या खोब्रागडे, किशोर राठोड, दिनेश राठोड, प्रविण कराळे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

नागपुर येथे शिवसेना मुख्यनेता तथा उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत माजी आमदार कॅप्टन अभिजीत अडसुळ यांच्या नेतृत्वात हा प्रवेश सोहळा पार पडला. या प्रवेशामुळे अमरावती जिल्हा शिवसेना उबाठा गटाला मोठे खिंडार पडले आहे.

# तुरीच्या दरात आठवडाभरात ९०० रुपयांची घसरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ अमरावती**

नवीन तूर बाजारात यायच्या आधीच पश्चिम विदर्भातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये तुरीचे भाव कमी झाले असून दर आठवडाभरात ९०० रुपयांनी घसरले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.



गेल्या ११ डिसेंबर रोजी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीला किमान ९ हजार २५० तर कमाल ९ हजार ८११ रुपये म्हणजे सरासरी ९ हजार ५३० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. बुधवारी १८ डिसेंबरला किमान ८ हजार ५०० रुपये आणि कमाल ८ हजार ८०० रुपये म्हणजे सरासरी ८ हजार ६५० रुपये इतका भाव मिळाला.

तुरीची आवक मुख्यतः जानेवारीपासून सुरु होते यंदाही याच काळात बाजारातील आवक जास्त राहू शकते, असा अंदाज आहे. सध्या नवीन तूर बाजारात येण्याच्या आधी साठवून ठेवलेली तूर बाजारात येत आहे. बाजारात आवक वाढल्यानंतर भाव कमी होतात.

विदर्भात मोठ्या प्रमाणात तुरीचे पीक घेतले जाते. मात्र, गेल्या वर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे तुरीच्या उत्पादनात मोठी घट झाली होती. त्यामुळे बाजारात तुरीची आवक मंदावली होती. आवक घटली असताना बाजारातून मागणी वाढल्याने तूर डाळीचे भाव गगनाला भिडले होते.

यावर्षी फेब्रुवारी महिन्यात तुरीच्या भावाने १० हजारांचा टप्पा ओलांडला होता. पण, आता तुरीचे भाव झपाट्याने खाली येत आहेत. सरकारने यंदा तुरीला ७ हजार ५५० रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला आहे. सध्या बाजारात हमीभावापेक्षा अधिक दर असले, तरी नवीन तूर बाजारात आल्यावर दरांमध्ये आणखी घसरण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**तूरडाळीच्या दरांमध्येही घसरण**

सहा महिन्यांनंतर तूरडाळीच्या दरात घसरण सुरू झाली आहे. किरकोळ बाजारात तूरडाळ १७० रुपये किलोपर्यंत तर मूगडाळ आणि इतर डाळीही शंभरीपार गेल्याने सर्वसामान्यांच्या जेवणातून डाळ कमी झाली होती. आता मात्र तूरडाळीचे दर घसरले आहेत. किरकोळ बाजारात तूरडाळचे दर २० रुपयांनी कमी झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

सरकारच्या चुकीच्या आयात-निर्यात धोरणाचा फटका हा शेतकऱ्यांना सातत्याने बसत आला आहे. जेव्हा बाजारात शेतमालाची आवक कमी होते, तेव्हा दर वाढण्याची अपेक्षा असताना आयात केली जाते आणि दर पाडले जातात. हे दुष्चक्र थांबायला हवे, अशी अपेक्षा शेतकरी संघटनेचे नेते जगदीश बोंडेयांनी व्यक्त केली आहे.

# शक्तीपेक्षा भक्ती अविनाशी आहे : हभप बाळासाहेब शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १९ अमरावती**

गाडी, बंगला आदी भोगवस्तूतून आनंद मिळणे हे भौतिक सुख आहे,हे सुख काही काळ सुख देते आणि जो भगवंताचे वेड लावतो,तो सर्व विकारापासून दूर जातो, त्याला आत्मिक सुख मिळते. यासाठी भक्तीची गरज आहे. शक्ती ही चिरकाल टिकत नाही, भक्ती अजरामर आहे, म्हणून शक्तीपेक्षा भक्ती अविनाशी आहे. अशी भक्तीमहिमा शिवचरित्रकार बाळासाहेब शिंदे यांनी तृतीय किर्तनसेवेदरम्यान गाडगेबाबानगर येथे विषद केली.

श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव बाबांच्या समाधीस्थळी गाडगेबाबा नगर येथे सुरु आहे. या महोत्सवात शिंदे महाराज आपल्या हरिकिर्तनातून म्हणाले की,भक्ती जेंव्हा अन्नामध्ये जाते तो महाप्रसाद होतो,भक्ती जेंव्हा घरात शिरते ते घर एक मंदिर होते.तसेच क्रांतिकारी विचार मांडत स्वातंत्र्यप्राप्ती साठी बलिदान देणा-या शूरविरांचे देशप्रेम सदैव स्मरणात ठेवून या भारतदेशाचे आधारस्तंभ बनण्याचा संदेश हभप बाळासाहेब शिंदे महाराजांनी दिला. यावेळी गाडगेबाबा मिशनचे बापुसाहेब देशमुख, व्यवस्थापक प्रकाश महात्मे, गजानन जवंजाळ, भरत महाराज रेळे, ऋषिकेश रेळे, अमोल राऊत, गिरीश हाडोळे यांच्यासह भाविकांची उपस्थीती होती.

# कांडलकर प्लॉटमार्गे कंपोस्ट डेपोकडे होणारी कचऱ्याची वाहतुक बंद करा

## परिसरातील नागरीक व शेतकऱ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ अमरावती**

कांडलकर प्लॉटमार्गे कंम्पोस्ट डेपोकडे जाणाऱ्या कंटेनरमुळे उडत असलेल्या मातीच्या धुळामुळे शेतीचा माल खराब होत असून त्या रस्त्याचे डांबरीकरण किंवा कॉंक्रिटीकरण केल्यानंतरच वाहतुक सुरू करण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरीकांनी महानगर पालिकेच्या प्रशासनाकडे केली आहे.



अमरावती महानगरपालिकेचे कचऱ्याचे कंटेनर कंम्पोस्ट डेपोकडे जात होते. परंतू रेल्वेचे काम सुरू असल्यामुळे रेल्वे विभागाने तो रस्ता बंद केला आहे. त्यांनी वळण रस्ता द्यावयास पाहिजे होता परंतू तो त्यांनी दिला नाही. ते कंटेनर सद्या कांडलकर प्लॉटच्या मार्गाने कच्च्या रस्त्याने रोज शेकडो कंटेनर भरधाव वेगाणे जात आहे. कच्चा रस्ता असल्यामुळे नागरीकांच्या घरात मातीची धुळ जात असून त्याच रस्त्याने लहान मुले शाळेत ये जा करतात. त्यामुळे त्या ठिकाणी अपघात होण्याची शक्यता टाळता येत नसून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच रस्त्याच्या बाजुला माती आहे. या धुळीमुळे शेतमालाचे प्रचंड नुकसान होत आहे. त्यामुळे या परीसरातून होत असलेली वाहतूक तातडीने बंद करावी व रस्त्याचे डांबरीकरण किंवा कॉंक्रिटीकरण केल्यानंतरच वाहतुक करावी अन्यथा आम्हाला नाईलाजास्तव उग्र आंदोलन करावे लागेल. त्याची सर्वस्वी जबाबदारी मनपा प्रशासनाची राहिल असा ईशारा पत्रकार यावेळी नागरीकांनी दिला.

पत्रकार परिषदेला गणेशदास गायकवाड, हिंम्मतराव फुलारी, बबनराव रडके, अशोकराव पांडे, विजय बडगुजर, मनोज हिवसे, राजुभाऊ गणोरकर, प्रदिप कांडलकर, नंदु पाटील, रामकिशोर वर्मा, गणेशराव टाकरखेडे, बंडूभाऊ इंगोले, प्रविण मोखडे, किशोर दलाल, राजेंद्र परीहार, सतिश भेंडवे, नितीन फुलारी, पिंटू मैहेंदळ, केशव अंबाडकर, दिपक अंबाडकर, पप्पू पाटील, मुकेश मावदे, पिंटू दखणे, संजय होले, अमोल खारकर, प्रमोद खारकर, निलेश मावदे, अशोक जुनघरे आदी उपस्थित होते.

# अंध अपंग कुष्ठरोग्यांना सुगंधी उठन साबण लावून अभ्यंग स्नान, वस्त्रदान, उलनचे ब्लँकेट वाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १९ अमरावती**

श्री संत गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबा नगर अमरावती च्या वतीने श्री गाडगेबाबा यांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव जोरात व उत्सव पूर्ण वातावरणात सुरू असून आज १८ डिसेंबरला दहा वाजता संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अंध अपंग कुष्ठरोगी निराश्रीत यांना अभ्यंग स्नान सुगंधी उठन साबण लावून अंघोळ घालण्यात आली त्यानंतर सुगंधी तेल सर्वांना



नवीन वस्त्र वस्त्रदान पंचारतीने ओवाळून हार अर्पण करण्यात आले त्यानंतर सर्वांना थंडीच्या दिवसांमध्ये ब्लँकेट चे वाटप स्वर्गीय गोविंदराव अच्युतराव देशमुख यांचे स्मृती प्रित्यर्थ श्रीमती प्रतिभाताई गोविंदराव देशमुख यांच्यातर्फे तर प्रशांत देशमुख मुंबई सौ . प्रीती हर्षित राव देशमुख अमरावती यांच्या हस्ते ब्लँकेट वाटप करण्यात आले याच कार्यक्रमात अहिल्याबाई होळकर परिषद अमरावती च्या पदाधिकारी महिला च्या वतीने सर्व महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आलं तसेच स्वर्गीय सुधाकरराव साबळे शेंडगाव यांच्या स्मृती प्रित्यर्थ तसेच भरत भाऊ रेडे यांच्या वतीने बुंदी तर राठी नगर येथील गजानन जवंजाळ यांच्यावतीने जिलेबी चे वाटप भोजनदानामध्ये करण्यात आले आजचा दिवस जणू काही दिवाळीच असल्याचा भास होत होता कुष्ठरोगी निराश्रीत वृद्धापुरुष आदिवासी आश्रम शाळेचे विद्यार्थी या सर्वांना जवळजवळ ३०० लोकांना बँकेचे वाटप प्रशांत देशमुख , प्रीती देशमुख अमरावती यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख,सागर देशमुख मुर्तीजापुर संस्थेचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे किशोर चौधरी, गजानन देशमुख दर्यापूर, गजानन जवंजाळ सतीश टाले अतुल रेडे, चंपक ठाकरे, सुधीर धोंगडे, मंगेश दादा वानखडे, वसंतराव लोहारेकर, कुमारी श्वेता प्रकाश महात्मे, आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# भुषण पाटणे यांनी रक्तदान करून वाढदिवस केला साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १९ अमरावती**

अमरावती जिल्ह्या मध्ये नाही तर महाराष्ट्रा मध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला असुन त्याकारिता नागरिकानी पुढाकार घेण्याची गरज आहे. याच जाणिवेतून युवा स्वाभिमान पार्टी व केसरिनंदन बहुउद्धेशिय संस्था तर्फे दि १७/१२/२०२४ रोजी भव्य रक्तदान शिबिर व फळ वाटप मधुबन वृध्दाश्रम येथे कार्यक्रम पार पडला.



दरवर्षि प्रमाणे या वर्षी सुद्धा भुषण अरविंदराव पाटणे रक्तदान करून आपला वाढदिवस साजरा केला. यांचेकरुन प्रेरणा घेत संपूर्ण मित्र परिवारा सह शिबिरा मध्ये रक्तदान केले. यावेळी पंजाबराव देशमुख रुग्णालय, अमरावती येथील रक्तपेढी विभागा होते. माज़ी नगर सेविका शोभाताई पाटने, मनोज चोर, शोभाताई गायकवाड़, नितीन काळमेघ, अर्चनाताई रोडे, संस्थेचे सुधिर कापसे, गजानन गुजर, सिध्देश सरोदे, गणेश काजे, रूपेश शेटे, प्रथमेश मानकर, अतुल तुपटकर, शुभांगी तुपटकर, गजानन अवसरमोल, प्रथमेश इंगोल अश्विन मावले, संदीप सरदार, बिट्टू, मानव डफ़र, आदित्य भेंडे, हिमांशु पवार, हर्शल पवार, यश गाड़ेकर, आकाश देशमुख, हेमंत पाघरे व मित्र परिवार उस्थित होते.